जा.क्र. मसंके/ प्रअ–टेटवली/ठेका/५७६/२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी
दिनांक :– २५ /१२ /२०२२

प्रती,
मा. प्रभारी अधिकारी
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**विषय** :– विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्दीस देणेबाबत......

महोदय,

उपरोक्त विषयान्वये या पत्रासोबत जोडलेली अननस लागवडीमधील कामे ठेका पध्दतीने करण्याबाबतची जाहीरात कृपया विद्यापीठाच्या www.dbskkv.org.in या संकेत स्थळावर प्रसिध्दीस देण्यात यावी ही विनंती.

प्रभारी अधिकारी
टेटवली विभाग
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी**
**टेटवली विभाग**

---

जा.क्र. मसंके/प्रअ–टेटवली/ठेका/ ५७६/ /२०२२ दि. २५/११ /२०२२

नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत टेटवली विभागातील दि. १२/१२/२०२२ ते ३०/०३/२०२३ या कालावधीत अननस लागवडीमधील कामे ठेका पध्दतीने करून घेण्यासाठी ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी मा. प्रभारी अधिकारी, टेटवली विभाग, म. स. के., वाकवली यांचेकडून कामाचे स्वरूप व एकूण कामे यांची माहीती घेवून दि. ०७/१२/२०२२ पर्यंत मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (टेटवली विभाग) येथे टपालाने/हात बटवडयाने बंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करावेत.

**कामाचे स्वरूपः–**

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| १. | निंदणी करणे, खते घालणे, फवारणी करणे, काढणी व विक्री करणे, पहारा देणे, पाणी व्यवस्थापन करणे. इ. कामे करणे. ( क्षेत्र – ५ एकर ) |

**ठेका कामाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत**

- ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरूप पाहूनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.
- ठेका मजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापसून निमस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख यांनी दिलेल्या सूचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे.
- ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचा F.No. 1/13(1)/2017-LS-11 दि. १७/३/२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेक्याचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.
- कामाची अदायगी महीना संपल्यावर किंवा ठेका संपल्यानंतर करण्यात येईल. संबधित देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक /प्रभारी अधिकारी यांचेकडील काम वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.
- ठेका अपूर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेकयाच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबधित ठेकेदाराचे दरपत्रक पुढील ठेक्याच्यावेळी ग्राहय धरले जाणार नाही.
- प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यावर दररोज संबंधितांकडे जमा करावयाचे आहे. औजारे नादुरूस्त झाल्यास दुरूस्तीसाठी होणारा खर्च ठेकेदाराच्या देयकामधून वसूल केला जाईल.
- प्रक्षेत्रावर दिलेल्या सूचनेनूसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी एनईएफटी/आरटीजीएस/ धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.
- ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यास संबधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.
- कामाच्या कालावधित ठेकेदार अथवा त्याच्या कामागाराकडून/मजूराकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदारच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किमंत वसुल करण्यात येईल व त्याबाबत ठेकेदारावर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.
- ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात यईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेला ठेका कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
- सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक एस.एल.पी. ५४५३/९० निर्णयानुसार ठेकेदारास किंवा त्याने नेमलेल्या मजूरास ठेका कालावधीमध्ये /ठेका कालावधीनंतर विद्यापीठ/ शासकीय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.
- ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखीत स्वरूपात करणे बंधनकारक राहील. कंपनीने/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

**प्रभारी अधिकारी**
टेटवली विभाग
मध्यवर्ती संशोधन केंद्र,वाकवली

**प्रत माहीतीसाठी सादर**
१. नोटीस बोर्ड, म. स. के., वाकवली,
२. ग्रमपंचायत : वाकवली/पांगारी/टेटवली